(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठीत भाषांतर)

सर्वोच्च न्यायालय अहवाल - [१९७०] २ एस. सी. आर - ४३४-४४४

दिवाणी अपिलीय अधिकारिता

दिवाणी अपील क्रमांक १४५६/१९६६.

देढ नथू राजा (मृत), त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी मार्फत.

विरुद्ध

एल. अंघा नथू जमाल (मृत), त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी मार्फत व इतर.

१६ सप्टेंबर, १९६९

[न्यायमूर्ती सी. शाह, व्ही. रामस्वामी आणि ए. एन. ग्रोव्हर, न्यायमूर्ती]

पद्धत आणि प्रक्रिया - राज्य पुनर्रचना अधिनियम (१९५६ चा ३७)चे कलम ५२, ५७ आणि ५९ - सौराष्ट्र भाग ब राज्यातील उच्च न्यायालय - एकल न्यायाधीशांच्या निकालावरून विभागीय खंडपीठात अपील फक्त प्रमाणपत्रासहच अनुज्ञेय - भाग ब राज्य मुंबई राज्यात विलीन झाले आणि भाग ब राज्यातील उच्च न्यायालय बंद करण्यात आले - खटले मुंबई उच्च न्यायालयात वर्ग केले - एकस्व पत्र (लेटर्स पेटंट), कलम १५ - प्रथम अपीलातील एकल

न्यायाधीशाचा निकाल प्रमाणपत्राशिवाय अपीलयोग्य - भाग ब राज्यातील उच्च न्यायालयात प्रथम अपील - विलीनीकरणानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांकडून निकाल दिला - खंड न्यायाधीश मंडळापुढे अपील प्रमाणपत्राशिवाय चालू शकते का?

सौराष्ट्र अध्यादेश क्र. २, १९४८ च्या कलम २२अ (२) अंतर्गत, जर न्यायाधीशाने प्रमाणित केले की प्रकरण अपिलासाठी योग्य आहे, तर त्या उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांच्या अपिलीय अधिकारितेमध्ये दिलेल्या निकालावरून सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या खंड न्यायाधीश मंडळापुढे अपील करता येते. राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ अंतर्गत, भाग 'ब' सौराष्ट्र राज्य हे मुंबई राज्यात विलीन करण्यात आले, १ नोव्हेंबर १९५६ पासून सौराष्ट्र उच्च न्यायालय बंद करण्यात आले आणि सौराष्ट्र उच्च न्यायालयासमोर प्रलंबित खटले मुंबई उच्च न्यायालयात वर्ग करण्यात आले. या अधिनियमाच्या कलम ५२ अंतर्गत, १ नोव्हेंबर १९५६ नंतर मुंबई उच्च न्यायालयाला त्या तारखेच्या लगेचच अगोदर सौराष्ट्र राज्यातील प्रदेशांच्या संबंधात सौराष्ट्र उच्च न्यायालयाकडे असलेली मूळ, अपिलीय आणि इतर अधिकारक्षेत्र प्रदान करण्यात आली. सौराष्ट्र अध्यादेश क्र. २, १९४८ हा सौराष्ट्र (केंद्र सरकारच्या विषयावरील कायद्यांचे अनुकूलन आदेश, १९५७) अंतर्गत १ नोव्हेंबर १९५६ पासून रद्द करण्यात आला आणि सौराष्ट्र उच्च न्यायालयाने केलेल्या पद्धत आणि प्रक्रियेबाबतचे नियम आणि आदेश राज्य पुनर्रचना अधिनियमाच्या कलम ५४ अंतर्गत मुंबई उच्च न्यायालयाने केलेल्या नियमांनुसार १ नोव्हेंबर १९५६ पासून रद्द करण्यात आले. राज्य पुनर्रचना अधिनियमाच्या कलम ५७ चा परिणाम असा झाला आहे की, नवीन मुंबई

राज्यातील उच्च न्यायालयाच्या खंड न्यायाधीश मंडळाचे अधिकार १ नोव्हेंबर १९५६ च्या तात्काळ अगोदर मुंबई राज्यात लागू असलेल्या कायद्या अंतर्गत खंड न्यायाधीश मंडळाच्या अधिकारांसारखेच असतील. मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटचे कलम १५, जे १ नोव्हेंबर १९५६ च्या तात्काळ अगोदर कायदा म्हणून मुंबई राज्यात लागू होते, त्यामध्ये अशी तरतूद आहे की, दुय्यम न्यायालयाच्या निकालाविरुद्ध झालेल्या प्रथम अपीलात मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाच्या निकालाविरुद्ध अपीलाची सुनावणी करणाऱ्या न्यायाधीशांच्या प्रमाणपत्राशिवाय अपील दाखल करता येते. मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटचे कलम १५ गुजरात उच्च न्यायालयाला देखील लागू होते, जे मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६० च्या परिणामस्वरूप स्थापन करण्यात आले.

सौराष्ट्र उच्च न्यायालयात १ नोव्हेंबर १९५६ रोजी प्रलंबित असलेल्या दुय्यम न्यायालयाच्या हुकूमनाम्याविरुद्धचे प्रथम अपील मुंबई उच्च न्यायालयाकडे वर्ग करण्यात आले आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांनी त्यावर निकाल दिला. मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटच्या कलम १५ अंतर्गत खंड न्यायाधीश मंडळ यांचेकडील अपील गुजरात उच्च न्यायालय स्थापनेनंतर गुजरात उच्च न्यायालयाकडे वर्ग करण्यात आले, परंतु गुजरात उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, १९४८ च्या सौराष्ट्र अध्यादेश क्र. २ च्या कलम २२अ अंतर्गत एकल न्यायाधीशांकडून प्रमाणपत्र नसल्यामुळे अपील अक्षम आहे.

या न्यायालयातील अपीलात, पुढील निर्णय पारित करण्यात आला.

निर्णय: (१) सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांच्या निर्णयाविरुद्ध अपील फक्त तेंव्हाच चालेल, जर एकल न्यायाधीशांनी प्रमाणित केले की ते खंडपीठासमोर अपिलासाठी योग्य प्रकरण आहे, हे अधिकार, कोणत्याही कायद्याच्या तरतुदींमध्ये विरुद्ध असल्याशिवाय, जेव्हा प्रकरण सुरू झाले तेव्हा त्यासोबतच जोडले गेले.

गरिकापट्टि विरय्या विरुद्ध सुबय्या चौधरी, (१९५७) एस्. सी. आर. ४८८, संदर्भ दिला (४४३ अ-ब).

(२) परंतु, १ नोव्हेंबर १९५६ पासून सौराष्ट्र उच्च न्यायालय बंद करण्यात आले, सौराष्ट्र अध्यादेश क्र. २, १९४८ रद्द करण्यात आला आणि सौराष्ट्र उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र मुंबई उच्च न्यायालयाकडे देण्यात आले. म्हणून, प्रथम अपील ऐकणारा उच्च न्यायालयाचा एकल न्यायाधीश, यांनी सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश म्हणून नव्हे तर मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश म्हणून ऐकले. [४४३ बी-सी]

(३) राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ चा कलम ५२ याचा अर्थ असा नाही की सौराष्ट्र राज्यातील प्रदेशांच्या संबंधात मुंबई उच्च न्यायालयाला प्रदान करण्यात आलेले अधिकार हे १ नोव्हेंबर, १९५६ रोजी सौराष्ट्रमध्ये लागू असलेल्या कायद्याच्या संदर्भात विनियमन करायचे आहेत. म्हणून, ते सौराष्ट्र अध्यादेशाच्या कलम २२अ (२) अंतर्गत निर्धारित केलेल्या मर्यादा मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटमध्ये स्पष्टपणे किंवा गर्भितपणे समाविष्ट करत नाही. [४४३ जी-

एच; ४४४ सी-डी].

(४) सौराष्ट्र अध्यादेशाच्या कलम २२अ अंतर्गत लावलेले निर्बंध हे केवळ सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाच्या निकालास लागू होते आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाच्या निकालास लागू होऊ शकत नाहीत आणि लेटर्स पेटंटच्या कलम १५ अंतर्गत वापरू शकणाऱ्या अपीलाच्या अधिकाराला प्रतिबंधित करण्यासाठी कार्य करू शकत नाहीत, म्हणून, मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाचा निकाल, राज्य पुनर्रचना अधिनियमाच्या कलम ५७ अंतर्गत, एकल न्यायाधीशाच्या प्रमाणपत्राशिवाय खंड न्यायाधीश मंडळापुढे अपीलासाठी अधीन होता. [४४३ डी-एफ].

दिवाणी अपिलीय अधिकारक्षेत्र : दिवाणी अपील क्र. १४५६/१९६६.

१९६० च्या लेटर्स पेटंट अपील क्र. ८ मधील गुजरात उच्च न्यायालयाच्या दिनांक ६ एप्रिल, १९६४ च्या आदेश व हुकूमनाम्याविरुद्ध अपील.

अपिलकर्त्यांसाठी – डी. यु. शाह, पी. सी. भरतारी आणि जे. बी. दादाचानजी.

उत्तरवादी क्र. १ (अ) ते १ (ई) आणि १ (ग) साठी – एस्. के. धोलकीस आणि विनीत कुमार.

या न्यायालयाचा न्यायनिर्णय न्या. शाह यांनी दिला –

या अपीलांना कारणीभूत ठरणारे तथ्य थोडे आणि सोपे आहेत. अपीलकर्त्याने, ३ मे, १९५१ रोजी, पूर्वीच्या भाग 'ब' सौराष्ट्र राज्यामधील मोरवी येथील सहाय्यक न्यायाधीशांच्या न्यायालयात एक एल. अंघा नथू जमाल आणि या अपीलमधील उत्तरवादी क्र. २ आणि ३ विरुद्ध रु. ९,३८७/५/– च्या एवढ्या रकमेच्या हुकूमनाम्यासाठी प्रकरण सुरू केले. संपरीक्षा न्यायालयाने १७ ऑक्टोबर १९५५ रोजी दाव्यामध्ये हुकूमनामा दिला. या हुकूमनाम्याविरुद्ध राजकोट येथील सौराष्ट्र उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले. १ नोव्हेंबर १९५६ रोजी सौराष्ट्र उच्च न्यायालय बंद करण्यात आले आणि त्या न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे मुंबई उच्च न्यायालयाकडे वर्ग करण्यात आली. २१ फेब्रुवारी १९५६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती व्यास यांनी अपील मंजूर केले. त्या आदेशाविरुद्ध, न्यायमूर्ती व्यास यांच्याकडून प्रकरण उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर अपीलासाठी योग्य आहे, असे प्रमाणपत्र प्राप्त करण्याअगोदरच मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटच्या कलम १५ अंतर्गत वादीने अपील दाखल केले. परंतु, १ मे १९६० रोजी मुंबई पुनर्रचना अधिनियम १९६० अंतर्गत अपील गुजरात उच्च न्यायालयाकडे वर्ग करण्यात आले. गुजरात उच्च न्यायालयाने असे निर्णित केले की, सौराष्ट्र अध्यादेश २, १९४८ च्या कलम २२अ अंतर्गत, प्रकरण उच्च न्यायालयाच्या खंड न्यायमंडळाप्रमाणे अपीलासाठी योग्य आहे असे प्रमाणित करणारे आदेश पारित केलेले नसल्यामुळे अपील अक्षम आहे. गुजरात उच्च न्यायालयाने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे हे

अपील दाखल करण्यात आले आहे.

काठियावाडमधील भारतीय संस्थानांच्या संस्थानिकांनी त्यांचे भूभाग जोडण्यास आणि त्यांचे एकात्मिकरण करून एकच कार्यकारी, विधिमंडळ आणि न्यायव्यवस्था असलेले संयुक्त सौराष्ट्र राज्य उभारण्यास मान्यता दिली. अध्यादेश १/१९४८ अन्वये सहकारी संस्थानांचे प्रशासन 'राजप्रमुखांकडे' सोपवण्यात आले. राजप्रमुखांनी, कराराच्या अनुच्छेद ९ (३) अंतर्गत त्यांना राखीव ठेवलेल्या अधिकारांचा वापर करून २९ फेब्रुवारी १९४८ पासून लागू होणारा, सौराष्ट्र राज्यासाठी उच्च न्यायालय स्थापन करण्यासाठीचा अध्यादेश २ /१९४८ जारी केला. कलम ३(सी) मध्ये "उच्च न्यायालय" या शब्दाची व्याख्या "या अध्यादेशाने स्थापन आणि गठित केलेले आणि सौराष्ट्र राज्यासाठी उच्च न्यायालय म्हणून कार्य करणारे उच्च न्यायालय" अशी केली आहे. कलम २१ अंतर्गत उच्च न्यायालय हे राज्यातील सर्वोच्च अपील न्यायालय आणि पुनरिक्षण न्यायालय असणार होते आणि या अध्यादेशाखाली किंवा राज्यात लागू असलेल्या कोणत्याही कायद्याखाली त्यांना अधिकार दिले जाणारे असे अपील, पुनरिक्षण आणि इतर खटले, दिवाणी किंवा फौजदारी, चालविण्याचे आणि त्यांचा निकाल देण्याचे अधिकारक्षेत्र त्यांना असणार होते. कलम २२ अंतर्गत उच्च न्यायालय हे निर्देशन न्यायालय देखील होते आणि त्याला निर्देशन केलेले सर्व खटले ऐकण्याचे, पुनरिक्षण करण्याचे आणि निकाल देण्याचे अधिकार होते. १९५० च्या अध्यादेश क्र. ५, अन्वये कलम २२अ जोडण्यात आले. त्यात असे नमूद करण्यात आले होते की:

(1) सध्या लागू असलेल्या कोणत्याही कायद्याने अन्यथा तरतूद करण्यात आली

नसेल तरी, उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांनी दिलेल्या कोणत्याही मूळ हुकूमनाम्यापासून, किंवा कोणत्याही आदेशापासून ज्याच्या विरुद्ध सध्या लागू असलेल्या कोणत्याही कायद्याने अपीलाची तरतूद केली आहे, किंवा भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत कोणत्याही आदेशापासून, उच्च न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे अपील करता येईल.

(2) उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांनी अपील अधिकारक्षेत्राचा वापर करून दिलेल्या हुकूमनामा किंवा आदेशाबाबत जर हुकूमनामा किंवा आदेश दिलेल्या न्यायाधीशांनी प्रमाणित केले की प्रकरण अपिलासाठी योग्य आहे, तर उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांच्या निकालावरून उच्च न्यायालयाच्या इतर दोन न्यायाधीशांच्या खंडपीठात अपील चालेल.

भारतीय राज्यघटनेनुसार, संयुक्त सौराष्ट्र राज्याचे राज्यक्षेत्र हे सौराष्ट्र भाग 'ब' राज्य म्हणून स्थापन करण्यात आले. राज्य पुनर्रचना अधिनियम १९५६ अंतर्गत सौराष्ट्र राज्याचे राज्यक्षेत्र मुंबई राज्यात विलीन करण्यात आले.

राज्य पुनर्रचना अधिनियम १९५६ च्या कलम ४९ अंतर्गत असे विहित करण्यात आले होते की, नियुक्त दिवसाच्या अगोदर मुंबई राज्याच्या संबंधात अधिकारक्षेत्र वापरणारे उच्च न्यायालय, नियुक्त दिवसापासून नवीन मुंबई राज्यासाठी उच्च न्यायालय म्हणून समजले जाईल. कलम

५०(१) अंतर्गत, नियुक्त दिवसापासून सर्व विद्यमान भाग 'ब' राज्यांच्या उच्च न्यायालयांनी (आवश्यक नसलेल्या काही अपवादांसह) कार्य करणे बंद करावयाचे होते आणि ते बंद करण्यात आले होते. कलम 52 अंतर्गत असे म्हटले आहे की,

"नवीन राज्यासाठीच्या उच्च न्यायालयाकडे, त्या नवीन राज्यात समाविष्ट असलेल्या प्रदेशांच्या कोणत्याही भागाच्या संबंधात सर्व अशी मूळ, अपीलीय आणि इतर अधिकारक्षेत्र असतील, जी नियुक्त दिवसाच्या तात्काळ अगोदर लागू असलेल्या कायद्यानुसार, त्याच नवीन राज्यात समाविष्ट असलेल्या प्रदेशांच्या त्या भागाच्या संबंधात विद्यमान राज्यासाठी कोणत्याही उच्च न्यायालयाने किंवा न्यायिक आयुक्त न्यायालयाने वापरण्यायोग्य आहे."

कलम ५४ अंतर्गत असे म्हटले आहे की,

"या भागामधील तरतुदींच्या अधीन राहून, नियुक्त दिवसाच्या तात्काळ अगोदर संबंधितातील राज्यासाठी उच्च न्यायालयात पद्धत आणि प्रक्रियेबाबत लागू असलेला कायदा, आवश्यक ते बदल करून, नवीन राज्यासाठी उच्च न्यायालयाच्या संबंधात लागू होईल, आणि त्यानुसार, नवीन राज्यासाठीच्या उच्च न्यायालयाकडे संबंधितातील राज्यासाठी उच्च न्यायालयाकडे नियुक्त दिवसाच्या तात्काळ अगोदर वापरण्यायोग्य असलेल्या पद्धत आणि प्रक्रियेबाबत नियम आणि

आदेश करण्याचे सर्व असे अधिकार असतील.

अशी तरतूद करण्यात आली आहे की, नियुक्त दिवसाच्या तात्काळ अगोदर संबंधितातील राज्यासाठीच्या उच्च न्यायालयात पद्धत आणि प्रक्रियेबाबत लागू असलेले कोणतेही नियम किंवा आदेश, नवीन राज्यासाठी उच्च न्यायालयाने केलेल्या नियमांनी किंवा आदेशांनी बदलले किंवा रद्द होईपर्यंत, आवश्यक ते बदल करून नवीन राज्यासाठी उच्च न्यायालयात पद्धत आणि प्रक्रियेच्या संबंधात लागू होईल, जणू काही ते त्या न्यायालयाने केले आहेत."

कलम ५९ (३) अंतर्गत अशी तरतूद करण्यात आली होती की, नियुक्त दिवसाच्या तात्काळ अगोदर सौराष्ट्र उच्च न्यायालयात किंवा कच्छच्या न्यायिक आयुक्त न्यायालयात प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे मुंबई उच्च न्यायालयाकडे वर्ग करण्यात येतील. कलम ११९ अंतर्गत अशी तरतूद करण्यात आली होती की,

"भाग [दोन] च्या तरतुदींमुळे ज्या प्रदेशांमध्ये नियुक्त दिवसाच्या तात्काळ अगोदर लागू असलेल्या कोणत्याही कायद्याचा विस्तार होतो किंवा लागू होतो अशा प्रदेशांमध्ये कोणताही बदल झाला आहे असे मानले जाणार नाही आणि विद्यमान राज्यासाठी अशा कोणत्याही कायद्यातील भौगोलिक संदर्भ, अन्यथा सक्षम विधिमंडळ किंवा इतर सक्षम प्राधिकारीद्वारे तरतूद न केल्यास, नियुक्त दिवसाच्या

तात्काळ अगोदर त्या राज्यातील प्रदेश असा अर्थ आहे असे समजले जाईल."

कलम १२७ अंतर्गत अशी तरतूद करण्यात आली होती की

"या अधिनियमाच्या तरतुदी या अधिनियमाशी विसंगत असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात समाविष्ट असलेल्या कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता लागू होतील."

राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ च्या कलम १२० अंतर्गत केंद्र सरकारला दिलेल्या अधिकरांचा वापर करून, सौराष्ट्र (केंद्रीय विषयांवरील कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९५७, हा आदेश केंद्र सरकारने जारी केला. या आदेशाच्या कलम ३ अंतर्गत अशी तरतूद करण्यात आली होती की सौराष्ट्र अध्यादेश २/१९४८ हा १ नोव्हेंबर १९५६ पासून रद्द करण्यात येईल. नवीन राज्यासाठीच्या मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाची अधिकारिता, अपीलीय शाखा, १९५० मध्ये नियम क्रमांक २५२-अ आणि २५२-ब नवीन दाखल केले. नियम २५२-अ अंतर्गत अशी तरतूद करण्यात आली होती की,

"नियुक्त दिवसाच्या तात्काळ मुंबई उच्च न्यायालयात पद्धत आणि प्रक्रियेबाबत लागू असलेले नियम आणि आदेश, हे त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या बदलांच्या अधीन राहून, उच्च न्यायालयातील पद्धत आणि प्रक्रियेला लागू होतील."

नियम २५२-ब अंतर्गत अशी तरतूद करण्यात आली होती की,

"नागपूर, हैदराबाद आणि सौराष्ट्र उच्च न्यायालयांनी आणि कच्छ न्यायिक आयुक्त न्यायालयाने केलेल्या पद्धत आणि प्रक्रियेबाबतचे नियम आणि आदेश, नवीन मुंबई राज्याच्या त्या भागात १ नोव्हेंबर १९५६ पासून रद्द करण्यात येतील जे १ नोव्हेंबर १९५६ पूर्वी मध्य प्रदेश, हैदराबाद, सौराष्ट्र आणि कच्छ या राज्याचा भाग होते."

गुजरात उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की सौराष्ट्र उच्च न्यायालयात सहायक न्यायाधीशांच्या निकालावरून उत्तरवादींनी दाखल केलेले अपील, सौराष्ट्र अध्यादेश २/१९४८ च्या कलम २२अ च्या तरतुदींना अधीन होते आणि राहिले आहे आणि न्या. व्यास यांच्या निर्णयाविरुद्धचे अपील हे केवळ त्यांनी सदर प्रकरण खंड न्यायाधीश मंडळासमोर अपीलासाठी योग्य आहे असे प्रमाणित केले तरच चालेल. मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटच्या कलम १५ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे:

"आणि आम्ही पुढे अध्यादेश देतो की, भारत सरकार अधिनियमाच्या कलम १०८ नुसार बंगालमधील फोर्ट विलियम येथील उच्च न्यायालयाच्या अधिकारितेमध्ये सदर उच्च न्यायालयातील एक न्यायाधीश किंवा कोणत्याही विभागीय न्यायालयातील एक न्यायाधीश यांनी पारित केलेला निकाल (जो सदर उच्च न्यायालयाच्या अधीक्षण शक्तीअंतर्गत अधीन असलेल्या एका न्यायालयाने त्याच्या अपीलीय अधिकारितेचा वापर करून एखादा हुकूमनामा किंवा आदेश यांच्या संदर्भात अपीलीय अधिकारितेचा वापर दिलेला न्यायनिर्णय नसेल आणि जो पुनरिक्षण अधिकारितेचा वापर करून दिलेला आदेश

नसेल आणि जो भारत सरकार अधिनियमाच्या कलम १०७ मधील तरतूदीनुसार अधिक्षण शक्तिचा किंवा फौजदारी अधिकारितेचा वापर करून दिलेली शिक्षा किंवा दिलेला आदेश नसेल तर) विरुद्धचे अपील चालेल आणि यापूर्वी काहीही तरतूद केलेली असली तरीदेखील, एखादा न्यायाधीश ज्याने न्यायनिर्णय पारित केलेला आहे त्याने असे जाहीर केले की सदर केस अपील दाखल होण्यास योग्य आहे तर भारत सरकार अधिनियमातील कलम १०८ अनुसार, उच्च न्यायालयातील एक न्यायाधीश किंवा कोणत्याही विभागीय न्यायालयातील एक न्यायधीश यांनी १ फेब्रुवारी १९२९ रोजी किंवा त्यानंतर, अपीलीय अधिकारितेचा वापर करून उक्त उच्च न्यायालयाच्या अधीक्षण शक्तीअंतर्गत असलेल्या एका न्यायालयाने एखादा हुकूमनामा किंवा आदेश यांच्या संदर्भात अपीलीय अधिकारितेच्या वापरात दिलेल्या न्यायनिर्णयावर निकाल दिला तर त्याविरुद्धचे अपील त्याच उच्च न्यायालयात चालेल; परंतु .... उक्त उच्च न्यायालयाच्या किंवा अशा विभागीय न्यायालयाच्या न्यायाधीशांनी दिलेल्या निकालांमधून उद्भवणारी अपीले चालविण्याचा अधिकार आमच्याकडे, आमच्या वारसदारांकडे व आमच्या उत्तराधिकाऱ्यांकडे असेल.

लेटर्स पेटंटच्या कलम १५ अंतर्गत मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांकडून दिवाणी दाव्यातून उद्भवलेल्या अपीलात दिलेला निकाल हा खंड न्यायाधीश मंडळासमोर अपीलास अधीन असतो, केवळ तेव्हा, जेव्हा सदर आदेश न्यायालयाच्या पुनरिक्षण अधिकारक्षेत्रामध्ये किंवा

दुसऱ्या अपीलात, किंवा फौजदारी अधिकारक्षेत्रामध्ये, किंवा भारत सरकार अधिनियम, १९३५ च्या कलम १०७ अंतर्गत अधीक्षण अधिकारामध्ये (संविधानाचा अनुच्छेद २२७) पारित केलेला असतो. न्यायमूर्ती व्यास, यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम करताना अपीलावर निर्णय दिला होता. प्रथमदर्शनी, दुय्यम न्यायालयाच्या निकालावरून पहिल्या अपीलात त्यांनी दिलेला निकाल हा मुंबई उच्च न्यायालयाच्या खंड न्यायाधीश मंडळासमोर अपीलास अधीन होता.

सौराष्ट्र अध्यादेश २, १९४८ च्या कलम २२अ आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटच्या कलम १५ मध्ये स्पष्टपणे विसंगती होती. कलम २२अ (२) च्या तरतुदीनुसार, "अपीलीय अधिकारक्षेत्रामध्ये पारित केलेल्या हुकूमनामा किंवा आदेशाच्या बाबतीत एकल न्यायाधीशाचा निकाल सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या खंड न्यायाधीश मंडळासमोर अपीलास अधीन होता, जेव्हा हुकूमनामा किंवा आदेश पारित करणारे न्यायाधीश प्रमाणित असे करतात की प्रकरण अपीलासाठी योग्य आहे." विधिमंडळाने पहिले अपील, दुसरे अपील, आदेशाविरुद्ध अपील आणि पुनरिक्षण अधिकारक्षेत्राच्या अंमलबजावणीत दाखल केलेल्या अर्जामध्ये कोणताही भेद केला नाही. परंतु मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटच्या कलम १५ अंतर्गत प्रथम न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध अपील हे प्रमाणपत्राशिवाय दाखल केले जाऊ शकते.

हुकूमनामा किंवा आदेशावरून अपील करण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे. त्याच्या उपसिद्धांतानुसार, न्यायालयाच्या हुकूमनाम्याला वरिष्ठ न्यायालयाच्या हस्तक्षेपापासून

संरक्षित ठेवण्याचा अधिकार आणि केवळ त्यातील मर्यादांच्या अधीन राहून अधिकार हा देखील निहित अधिकार आहे आणि तो स्पष्ट अधिनियम किंवा सुधारित कायद्याच्या स्पष्ट परिणामाद्वारे काढून घेतला जाऊ शकतो. कोलोनियल शुगर रिफायनिंग कंपनी विरुद्ध इरविंग[1] (१९०५ ए. सी. ३६९) या प्रकरणात न्यायिक समितीने असे ठरवले की, चालू असणाऱ्या दाव्यातील वादीला वरिष्ठ न्यायाधिकरणाकडे अपील करण्यापासून वंचित ठेवणारी तरतूद, जी त्याला अधिकार म्हणून होती, ती प्रक्रिया नियंत्रित करत नाही. ऑस्ट्रेलियन कॉमनवेल्थ जुडीशियरी कायदा, १९०३ हा अधिनियम २५ ऑगस्ट १९०३ रोजी लागू झाला. क्वीन्सलँडच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावरून २५ ऑक्टोबर १९०२ रोजी सुरू झालेल्या खटल्यात न्यायिक समितीकडे अपील करण्याची परवानगी मागण्यात आली आणि ४ सप्टेंबर १९०३ रोजी परवानगी देण्यात आली. न्यायिक समितीकडून अपील ऐकताना, उत्तरवादींनी अर्ज केला की, ऑस्ट्रेलियन कॉमनवेल्थ जुडीशियरी कायदा, १९०३ च्या कलम ३९ अंतर्गत खालच्या न्यायालयाची अपील करण्यासाठीची परवानगी देण्यासाठीची तरतूद रद्द करण्यात आली आहे या कारणास्तव क्वीन्सलँडच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावरून अपील फेटाळून लावावे. न्यायिक समितीने हा अर्ज फेटाळला. लॉर्ड मॅकनॅग्टन यांनी पुढील निरिक्षण नोंदविले:

> “प्रकरणाला लागू होणाऱ्या सामान्य तत्त्वांच्या बाबतीत कोणताही वाद नाही. एकीकडे, जर वादातीत विषय हा केवळ प्रक्रियांचा विषय असेल तर याचिका (फेटाळण्यासाठी) तर्कशुद्ध

1 [१९०५] ए.सी.३६९.

आहे हे वादग्रस्त नव्हते. दुसरीकडे, जर तो केवळ प्रक्रियांचा विषय नसेल, व जर तो न्यायपालिका अधिनियमाच्या पारित होण्याच्या वेळी अस्तित्वात असलेल्या अधिकाराशी संबंधित असेल, तर लॉर्ड कोकपासून आजपर्यंतच्या प्राधिकाऱ्यांच्या दीर्घ पंक्तीनुसार असे मान्य करण्यात आले की अपीलकर्त्यांना (शुगर कंपनी) यश मिळण्यास पात्र असतील. न्यायपालिका अधिनियम हा स्पष्ट अधिनियम किंवा आवश्यक हेतुद्वारे भूतलक्ष्यी नाही. आणि म्हणून, एकमेव प्रश्न आहे, अधिनियमाच्या पारित होण्याच्या तारखेला अपीलकर्ते यांच्याकडे निहित असलेला अधिकार हा महामहिम राजाच्या परिषदेकडे अपील करण्याचा अधिकार होता की तो केवळ प्रक्रियेचा विषय होता? न्यायमूर्तींना असे वाटते की प्रश्नामध्ये शंकेला स्थान नाही. प्रलंबित प्रकरणातील वादीला एका वरिष्ठ न्यायाधिकरणात अपील करण्यापासून वंचित ठेवणे जो त्याचा अधिकार म्हणून होता, हा प्रक्रियांचे नियमन करण्यापेक्षा बराच वेगळा विषय आहे."

गरिकापट्टी वीरय्या विरुद्ध एन. सुब्बय्या चौधरी[2] या प्रकरणात, या न्यायालयाने कोलोनियल शुगर रिफायनिंग कंपनी[3] प्रकरणातील तत्त्व स्वीकारले. त्यामुळे, विरुद्ध तरतुदीच्या

2[१९५७] एस.सी.आर. ४८८.

3[१९०५] एस.सी. ३६९.

अभावी, १९५१ मध्ये प्रकरण सुरू झाले तेव्हा कारवाईशी संबंधित हक्क असा होता की, सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाच्या निर्णयाविरुद्ध अपील फक्त तेंव्हाच चालेल जेव्हा प्रकरणाचा निर्णय देणारा न्यायाधीश प्रकरणाला अपील करण्यायोग्य असल्याचे प्रमाणित करेल. परंतु सौराष्ट्र उच्च न्यायालय १ नोव्हेंबर १९५६ पासून बंद करण्यात आले आणि सौराष्ट्र उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र मुंबई उच्च न्यायालयाकडे देण्यात आले. हे प्रकरण न्या. व्यास यांनी, सौराष्ट्र उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नव्हे तर मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, म्हणून चालविले. कलम २२अ अंतर्गत तरतूद केलेले निर्बंध हे सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांपैकी एका न्यायाधीशाच्या निकालाला लागू होते: ते मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या निकालाला लागू होत नाही. सौराष्ट्र अध्यादेश २, १९४८ रद्द करण्यात आला आणि अपील चालविण्याचे अधिकारक्षेत्र मुंबई उच्च न्यायालयाकडे देण्यात आले त्यामुळे, मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय दिलेल्या प्रकरणातील पक्षकारांकडून अपील करण्याचा वापरला जाणारा अधिकार त्या न्यायालयाच्या लेटर्स पेटंटद्वारे नियंत्रित होता, सौराष्ट्र अध्यादेश २, १९४८ च्या कलम २२अ द्वारे नव्हे. कलम २२अ अंतर्गत विहित केलेली घटना प्रकरणाशी जोडलेली राहिली आहे असे मान्य केले तरी, सौराष्ट्र अध्यादेशाच्या कलम २२अ च्या तरतुदी मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या निकालांना नियंत्रित करणाऱ्या लेटर्स पेटंटच्या कलम १५ अंतर्गत वापरल्या जाणाऱ्या अपील करण्याच्या अधिकराला प्रतिबंधित करू शकत नाही. कोलोनियल शुगर

रिफायनिंग कंपनी[4] प्रकरणातील नियमाची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने अध्यादेशाच्या कलम २२अ मधील "उच्च न्यायालयाचे न्यायाधीश" ही अभिव्यक्ति म्हणजे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असा अर्थ लावता येणार नाही. केंद्र सरकारने प्रख्यापित केलेल्या सौराष्ट्र (केंद्रीय विषयांवरील कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९५७ आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटच्या कलम १५ चा वापर यांद्वारे निरसनाचा अतिशय स्पष्ट अभिप्रेत अर्थ असा होता कि, न्या. व्यास यांचा निकाल हा प्रस्तुत न्यायाधीश यांच्याद्वारे प्रकरण अपीलासाठी योग्य आहे या प्रमाणपत्राशिवाय खंड न्यायाधीश मंडळासमोर अपीलाच्या अधीन आहे.

उत्तरवादींच्या वकिलांनी आपल्या युक्तिवादाला समर्थन देण्यासाठी राज्ये पुनर्रचना अधिनियम, १९५६ च्या कलम ५२ च्या तरतुदींचा आधार घेतला. परंतु ते कलम केवळ १ नोव्हेंबर १९५६ नंतर मुंबई उच्च न्यायालयाला मूळ, अपील आणि इतर अधिकारक्षेत्र प्रदान करते, जे सौराष्ट्र उच्च न्यायालयाकडून १ नोव्हेंबर १९५६ च्या तात्काळ आधी सौराष्ट्र राज्यातील प्रदेशांच्या बाबतीत वापरले जात होते. ते कलम सौराष्ट्र अध्यादेश २, १९४८च्या कलम २२अ (२) अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या मर्यादा मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटमध्ये स्पष्टपणे किंवा ध्वनीतार्थाने परिणामाद्वारे समाविष्ट करत नाही. सौराष्ट्र उच्च न्यायालय १ नोव्हेंबर १९५६ रोजी वापरू शकत

4[१९०५] एस.सी. ३६९.

असलेले - मूळ, अपील आणि इतर - अधिकारक्षेत्र हे सौराष्ट्र राज्याच्या प्रदेशांच्या बाबतीत मुंबई उच्च न्यायालयाकडे निहित झाले आणि राज्य पुनर्रचना अधिनियमाच्या कलम ५९ च्या उप-कलम (३) च्या तरतुदींनुसार प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाकडे वर्ग झाल्यानंतर, सौराष्ट्र उच्च न्यायालयासमोर उत्तरवादीने दाखल केलेले अपील मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील अधिकारक्षेत्राच्या अंमलबजावणीत, सुनावणी योग्य होते. न्या. व्यास यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम केले आणि त्यांचे प्रथम अपीलामध्ये दिलेले निकाल हे, स्पष्ट विरुद्ध तरतुदीच्या अभावी, प्रमाणपत्राशिवाय लेटर्स पेटंटच्या कलम 15 अंतर्गत खंडन्यायाधीश मंडळासमोर अपीलाच्या अधीन होते.

गुजरात उच्च न्यायालय या निर्णयात बरोबर होते की, पूर्वीच्या सौराष्ट्र राज्याच्या भागांच्या बाबतीत, मुंबई उच्च न्यायालयास सौराष्ट्र उच्च न्यायालयाकडे असलेले तेच अधिकारक्षेत्र प्राप्त झाले. तथापि, याचा अर्थ असा होत नाही की अधिकारक्षेत्राचे “नियुक्त दिवशी” म्हणजे १ नोव्हेंबर १९५६ रोजी लागू असलेल्या कायद्याच्या संदर्भात" विनिमयन करावयाचे होते. राज्ये पुनर्रचना अधिनियमाच्या कलम ५२ ने नियुक्त दिवसाच्या तात्काळ आधी लागू असलेल्या कायद्यानुसार मूळ, अपील आणि इतर अधिकारक्षेत्र जतन केले जे सौराष्ट्र राज्याच्या हद्दीतील प्रदेशांच्या बाबतीत वापरले जात होते. त्यावेळी लागू असलेल्या कायद्यानुसार कोणतीही मर्यादा अधिकारक्षेत्र वापरताना स्पष्ट तरतुदीद्वारे किंवा स्पष्ट ध्वनितार्थाद्वारे जतन केली गेली नाही तर, लेटर्स पेटंटच्या कलम १५ च्या तरतुदी लागू होणे आवश्यक आहे.

राज्ये पुनर्गठन अधिनियम, १९५६ च्या कलम ५७ च्या तरतुदी परत बोलावणे आवश्यक आहे, ज्यात असे नमूद केले आहे की संबंधित राज्याच्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश, एकल न्यायाधीश आणि खंडन्यायाधीश मंडळाच्या अधिकारांशी संबंधित आणि अधिकारांच्या अंमलबजावणीशी संबंधित बाबींशी संबंधित नियुक्त दिवसाच्या तात्काळ लागू असणारा कायदा, नवीन राज्याच्या उच्च न्यायालयाच्या बाबतीत आवश्यक ते बदल करून लागू होईल. १ नोव्हेंबर १९५६ रोजीच्या तात्काळ आधी, प्रथम अपीलामध्ये आपल्या शक्तिंचा वापर करत असलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाच्या निकालाविरुद्ध कोणत्याही प्रमाणपत्राशिवाय खंड न्यायाधीश मंडळासमोर अपील दाखल करता येऊ शकत होते. सौराष्ट्र उच्च न्यायालयाकडून मुंबई उच्च न्यायालयाकडे कलम ५९ (३) अंतर्गत वर्ग करण्यात आलेली प्रकरणे हाताळताना, खंड न्यायाधीश मंडळाची अपीलावर सुनावणी घेण्याची शक्ति मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकडे कायम राहिली. कलम ५७ च्या तरतुदींनुसार संबंधित राज्यासाठी म्हणजे नवीन मुंबई राज्यासाठी उच्च न्यायालयाच्या खंडन्यायाधीश मंडळाचे अधिकार हे मुंबई राज्यात नियुक्त दिवसाच्या तात्काळ आधी लागू असलेल्या कायद्याअंतर्गत खंडन्यायाधीश मंडळाच्या अधिकारांसारखेच असतील. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडन्यायाधीश मंडळ हे दुय्यम न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध प्रथम अपील निर्णित करणाऱ्या एकल न्यायाधीशाच्या निकालाविरुद्धचे अपील सदर प्रथम अपीलामध्ये निर्णय देणाऱ्या न्यायाधीशाच्या प्रमाणपत्राशिवाय हाताळण्यास सक्षम होते.

गुजरात उच्च न्यायालयाने "अधिकार" आणि "अधिकारक्षेत्र" यांच्यात फरक केला आहे आणि त्यांनी असे मत व्यक्त केले आहे की, राज्ये पुनर्रचना अधिनियम, १९५६ च्या कलम ५२ मध्ये नवीन मुंबई राज्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाची अपीलीय अधिकारिता ही सौराष्ट्र भागाच्या बाबतीत सौराष्ट्र उच्च न्यायालयाकडे असलेल्या अधिकारितेसारखीच असल्याचे नमूद केले आहे, याचा अर्थ मुंबई उच्च न्यायालयाकडे सौराष्ट्र उच्च न्यायालयाकडे मुळातच असलेली अधिकारिता आहे आणि त्या अधिकारितेचा वापर सौराष्ट्र उच्च न्यायालय ज्या मर्यादांच्या अधीन होते त्याच मर्यादांच्या अधीन आहे. आम्ही या मताशी नाही. राज्ये पुनर्रचना अधिनियम, १९५६ च्या कलम ५२ मध्ये असे म्हटलेले नाही आणि त्याच अधिनियमाच्या कलम ५७ मध्ये विरुद्ध तरतूद आहे.

गुजरात उच्च न्यायालयाचे असेही मत होते की, राज्ये पुनर्रचना अधिनियम, १९५६ च्या कलम ५२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाअंतर्गत समाविष्ट असलेल्या प्रत्येक भागाच्या प्रादेशिक न्यायाधिकारांच्या संदर्भातच "कायदा स्पष्ट करते" आणि जर विधिमंडळाने मुंबई उच्च न्यायालयाची अधिकारिता वाढवली आणि रद्द करण्यात आलेल्या उच्च न्यायालयाकडे असलेली अधिकारिता देखील कायम ठेवली, तर सदर अधिकारितेमध्ये संघर्ष होईल व परिणाम "विचित्र आणि विरोधी" होईल, न्यायाधिकारात संघर्ष होईल. परंतु, आमच्या मते, हा निष्कर्ष काढण्याचा आधार आहे की, मुंबई उच्च न्यायालयाची अधिकारिता, संघर्षाच्या बाबतीत, सौराष्ट्र प्रदेशाच्या बाबतीत मूळ उच्च न्यायालयाकडून अधिकारितेच्या वापरावरील मर्यादांवर मात करते, आणि मुंबई उच्च न्यायालयाची अधिकारिता कोणत्याही व्यक्त न केलेल्या मर्यादेमुळे प्रतिबंधित होत

नाही.

गुजरात उच्च न्यायालयाने असे मान्य केले की ते ज्या निष्कर्षापर्यंत पोहोचले त्यात न्यायदानातील दोष उघड झाला आहे. त्यांनी नमूद केले:

"विचाराधीन प्रकरणांच्या बाबतीत सौराष्ट्र उच्च न्यायालयाची अधिकारिता अबाधित ठेवण्यासाठी विधिमंडळाकडे चांगले कारण असू शकते. तथापि, आमच्या निष्कर्षाचा पुनर्रचना अधिनियम लागू झाल्यानंतर दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांवर परिणाम होतो. आमच्या मते, सौराष्ट्र आणि कच्छ भागातील पक्षकारांना आता जुन्या मुंबई भागातील पक्षकारांपेक्षा वेगळी वागणूक देण्याचे कोणतेही कारण नाही. आमच्या मते, सर्व भागातील पक्षकारांचे अपील करण्याचे हक्क आता एकाच आधारावर ठेवणे आवश्यक आहे. आम्ही संबंधित अधिकाऱ्यांना ही बाब तपासण्याची आणि आवश्यक असल्यास, सौराष्ट्र आणि कच्छ भागातील पक्षकारांना गुजरात राज्यातील इतर पक्षांप्रमाणेच अपील करण्याचे समान हक्क देण्यासाठी आवश्यक कायदा करण्याची शिफारस करतो."

आमच्या मते, “सौराष्ट्र उच्च न्यायालयाची जुनी अधिकारिता” विचाराधीन प्रकरणांच्या बाबतीत कलम ५२ द्वारे जतन केल्या गेल्या संबंधीचा निष्कर्ष चुकीचा आहे. राज्ये पुनर्रचना अधिनियम, १९५६ ला अधिकारिता वापरण्यावरील मर्यादा जतन करणे अभिप्रेत नाही आणि “नियुक्त दिवसाच्या तात्काळ आधी लागू असलेल्या कायद्यानुसार मूळ, अपील आणि इतर

अधिकारिता” या अभिव्यक्तीच्या वापरामुळे कोणताही ध्वनीतार्थ उद्भवत नाही, की अधिकारिता वापरण्यावरील मर्यादा ज्या १ नोव्हेंबर १९५६ रोजी अस्तित्वात होत्या त्या मर्यादा, राज्ये पुनर्गठन अधिनियमाच्या कलम ५७ च्या तरतुदी काहीही असल्या तरी, जतन करण्यात आल्या.

गुजरात उच्च न्यायालयाने दिलेला आदेश रद्द करण्यात आला आहे आणि प्रकरण मूळ क्रमांकाखाली पुन्हा प्रविष्ट करण्यासाठी आणि कायद्यानुसार सुनावणी होण्यासाठी आणि निकाल देण्यासाठी उच्च न्यायालयाकडे परत पाठविण्यात आले आहे. उच्च न्यायालयातील खर्च हा खर्चाबाबतचा आदेश असेल.

अपील मान्य आणि प्रकरण परत पाठवले.

व्ही. पी. एस.

****

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी

करता वैध मानला जाईल.

****